स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

प्रा.डॉ. गणेश भामे
एम्.ए., पीएच् डी.
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९
: ०२०–२५६२२६९०/९१
: ०२०–२५६२२६९२
: ०२०–२५६९७३४१


संदर्भ : रासेयो/२०२६–२७/७१ दि. ०५/०६/२०२६

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये परिसंस्था,
पुणे, अहिल्यानगर व नाशिक जिल्हा,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय : जागतिक पर्यावरण दिन दि. ०५ जून २०२६ रोजी साजरा करण्याबाबत...
संदर्भ : मा. राज्य संपर्क अधिकारी, रासयो, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, महाराष्ट्र शासन यांचे दि. ०३/०५/२०२६ रोजीचे पत्र

महोदय,

उपरोक्त विषय आणि संदर्भीय पत्रान्वये दि. ०५ जून हा दिवस जगभरात 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. पर्यावरणीय समस्यांवर जागरूकता निर्माणकरणे, पर्यावरण संतुलन, संरक्षणासाठी आणि संवर्धनाची जाणीव करून देण्याकरिता विविध उपक्रमांचे आयोजन करण्याकरिता सूचित करण्यात आले आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयामध्ये रासेयो विद्यार्थ्यांमार्फत पर्यावरणाबाबत विद्यार्थ्यामध्ये जबाबदारी निर्माण करण्याकरिता तसेच हरित धरती करण्याच्या दृष्टीकोनातून पावसाळयामध्ये वृक्ष लागवडीसाठी खड्डे तयार करणे, रोपे, खते इत्यादींची पूर्वतयारी करून वृक्ष लागवड व पर्यावरण संवर्धनाचे कार्य करावे.

तसेच याबाबतचा अहवाल BOD लॉगीनमध्ये NSS - Gov Other Reports - Add New - योजना/उपक्रम निवडा यामध्ये उपक्रमाचे नाव **"जागतिक पर्यावरण दिन २०२६"** या विषयाची निवड करून सादर करण्यात यावा. सदर कार्यक्रमाचे सविस्तर पत्र आपल्या माहिती व उचित कार्यवाहीकरिता सोबत जोडले आहे. कळावे, ही विनंती.



संचालक (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय,**
एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१.
ई-मेल- nssmantralaya@gmail.com दूरध्वनी क्र. ०२२-२२६७९५६५.

क्रमांक: रासेयो-२०२६/प्र.क्र. ५०/रासेयो कक्ष दिनांक: ०३ जून, २०२६

**प्रति,**

**कार्यक्रम समन्वयक तथा संचालक,**
रासेयो संलग्नित,
सर्व विद्यापीठे/संचालनालये, महाराष्ट्र राज्य.

**विषय:-दिनांक ०५ जून, २०२६ रोजी जागतिक पर्यावरण दिन (WED) साजरा करणेबाबत...**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, दिनांक ०५ जून हा दिवस जगभरात "**जागतिक पर्यावरण दिन**" म्हणून साजरा करण्यात येतो. पर्यावरणीय समस्यांवर जागरूकता निर्माण करण्यासाठी, **जागतिक पर्यावरण दिन** हे एक जागतिक व्यासपीठ आहे. या व्यासपीठामार्फत रासेयो स्वयंसेवकांना पर्यावरणाच्या संतुलनासाठी, संरक्षणासाठी आणि संवर्धनाची जाणीव करून देण्याकरीता आपल्या स्तरावर पर्यावरणविषयक कार्यक्रमाचे आयोजन करावे.

**२.** त्याचप्रमाणे आपल्या विद्यापीठे व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांमध्ये पर्यावरणाबाबत विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारी निर्माण करण्याकरीता तसेच हरित धरती करण्याच्या उद्देशाने व तापमान वाढ कमी करण्याच्या दृष्टीकोनातून जास्तीत जास्त प्रमाणात वृक्षारोपण करून पर्यावरण संतूलन राखण्याच्या दृष्टीकोनातून येत्या पावसाळ्यामध्ये वृक्ष लागवड करण्याच्या अनुषंगाने लागणाऱ्या आवश्यक असणाऱ्या ज्या-ज्या बाबी जसे की:- वृक्ष लागवडीसाठी खड्डे तयार करणे, रोपे, खते, वृक्ष लागवडीसाठी लागणारी माती इत्यादींची पूर्वतयारी करण्यात येऊन, आपल्या विभागातील वातावरणीय बदलानुसार योग्य त्यावेळेस वृक्ष लागवड करण्यात येऊन, पर्यावरण संवर्धनाचे कार्य करावे.

**३.** सबब, सदर उपक्रमात विद्यापीठे व विद्यापीठांतर्गत महाविद्यालयांतील रासेयो स्वयंसेवक तसेच इतर विद्यार्थी सहभागी झाल्याबाबतची सांख्यिकीय माहिती/अहवाल राज्य संपर्क अधिकारी, रासेसो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, एल्फिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर, ३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई-४०० ००१ यांना दिनांक १५ जून, २०२६ पर्यंत सादर करण्यात यावा.

**(डॉ.मिलिंद काळे)**
राज्य संपर्क अधिकारी, विशेष कार्य अधिकारी,
राष्ट्रीय सेवा योजना, महाराष्ट्र शासन

**प्रत माहितीस्तव सादर.**
१) मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक मंत्रालय, मुंबई.
२) मा. अपर मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) रासेयो क्षेत्रिय संचालक, क्षेत्रिय संचालनालय, पुणे.
५) निवडनस्ती- रासेयो कक्ष.